कळंबोलीतील हॉकर्स प्लाझामध्ये फेरीवाल्यांना जागा द्या!

आमदार प्रशांत ठाकूर यांची सूचना

सिडको अधिकाऱ्यांसह संयुक्त पाहणी

पनवेल :

कळंबोली येथील फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र हॉकर्स प्लाझा तयार करण्यात आले आहे. सिडकोने या हॉकर्स प्लाझामध्ये फेरीवाल्यांना वापरासाठी जागा लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. १) सिडको अधिकाऱ्यांकडे केली.

कळंबोली परिसरातील फेरीवाल्यांचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. फेरीवाल्यांमुळे पादचारी फुटपाथ अडविले जात असल्याने नागरिकांना त्रासाचे होते. यावर उपाय म्हणून कळंबोली येथील फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र हॉकर्स प्लाझा तयार करण्यात आले आहे. या हॉकर्स प्लाझाची पाहणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. या वेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय भाटीया यांच्यासह अन्य अधिकारी व हॉकर्स असोसिएशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. हॉकर्स प्लाझातर्फे आमदार प्रशांत ठाकूर व सिडकोचे संजय भाटीया यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

फेरीवाल्यांना होलसेल व रिटेल अशा दोन्ही व्यवसायासाठी हॉकर्स प्लाझामध्ये जागा उपलब्ध करावी आणि येथील वातावरण आरोग्यदायी वा हायजेनिक असावे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको अधिकाऱ्यांना सूचविले.